# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.03.2025** **वारःशनिवार**

---

1. गुजरातच्या लखपती दीदी संमेलनात पंतप्रधानांचा आज लखपती दीदींसोबत संवाद
2. महिलांसाठी सुरक्षित वाटणाऱ्या समाजाची निर्मिती करण्याचं आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त राष्ट्रपतींचं आवाहन
3. मुंबईत होणाऱ्या वेव्ज परिषदेच्या तयारीचा प्रसारण मंत्रालय सचिवांकडून आढावा
4. फिडे जागतिक कनिष्ठ बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेत प्रणव वेंकटेशनला विजेतेपद आणि
5. सहाव्या आशियाई महिला कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेत भारत- इराण यांच्या अंतिम लढत

**<u>पंतप्रधान-लखपतीदीदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गुजरात दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी, आज गुजरातमधील नवसारी जिल्ह्यातल्या वंशी बोरसी गावात होणाऱ्या लखपती दीदी संमेलनात सहभागी होऊन लखपती दीदींशी संवाद साधणार आहेत. पाच लखपती दीदींना ते प्रमाणपत्रही प्रदान करतील. या संमेलनात नवसारी, वलसाड आणि डांग जिल्ह्यातील 1 लाखाहून अधिक महिला सहभागी होतील तसेच पंतप्रधान गुजरातमधील 25 हजारांहून अधिक बचत गटांमधील महिलांना साडेचारशे कोटी रुपयांहून अधिक रकमेची मदत प्रदान करणार असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. अंत्योदय कुटुंबासाठी गुजरात सरकारकडून राबवण्यात येणाऱ्या जी सफल आणि ग्रामी उत्पन्नात बदल घडवण्याच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या जी मैत्री या दोन योजनांचा शुभारंभ त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>पंतप्रधान-दीव</u>**

पंतप्रधानांनी गुजरात दौऱ्याच्या पहिल्या दिवशी काल, दीव, दमण, दादरा आणि नगर हवेली इथं एकंदर पंचवीसशे कोटींहून अधिक मूल्यांच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. या प्रकल्पांमध्ये शाळा, आरोग्य कल्याण केंद्र, ग्रामीण रस्ते आणि महामार्ग प्रकल्प तसंच इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश आहे. पंतप्रधानांच्या हस्ते काल सिल्वासा इथं साडेचारशे खाटांच्या नमो रुग्णालय आणि संशोधन केंद्राचं उद्घाटनही करण्यात आलं. त्यानंतर संध्याकाळी पंतप्रधानांनी सुरतमध्ये जिल्हा अन्न सुरक्षा आणि परिपूर्णता मोहिमेचा शुभारंभ केला. देशाला कुपोषणमुक्त आणि सुदृढ करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरूच्चार करताना पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना, सरकारी विमा योजना आणि एक राष्ट्र एक रेशन कार्ड यांचा वंचितांना फायदा झाल्याचे सांगितले. पंतप्रधानांनी सुरतमधील सव्वादोन लाखांहून अधिक लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत लाभांचे वाटप केले. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>आंतरराष्ट्रीय महिला दिन</u>**

आज जागतिक महिला दिन साजरा केला जात आहे. सर्व महिला आणि मुलींसाठी अधिकार, समान हक्क,आणि सबलीकरण ही यंदाच्या महिला दिनाची संकल्पना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात या कार्यक्रमातून, आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नमो ॲप ओपन फोरमवर देशातल्या महिलांना त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाची माहिती देण्यासाठी प्रोत्साहित केलं आहे. यासाठी विशेष उपक्रम म्हणून महिला आज प्रातिनिधिक स्वरूपात पंतप्रधानांच्या समाज माध्यम खात्याचा

उपयोग करणार असल्याचंही त्यांनी जाहीर केलं आहे. महिलांच्या योगदानाचा गौरव, सक्षमीकरण, चिकाटी आणि त्यांच्या यशाच्या प्रवासातून इतरांना प्रेरणा देणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**मुर्मू महिला दिवस**

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनीही सर्वांना या दिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. देश आणि समाज यांच्याप्रती दिलेल्या योगदानाचा आणि महिला शक्तीचा सन्मान करण्याचा आजचा दिवस आहे. असे सांगून राष्ट्रपतींनी प्रत्येक महिलेला सुरक्षित वाटेल आणि पुढे जाण्यासाठी समान संधी मिळेल अशा समाजाची निर्मिती करण्याचे आवाहन त्यांनी देशवासियांना केलं आहे.

**महिला दिन-दिल्ली आकाशवाणी**

दिल्लीतल्या आकाशवाणी वृत्त विभागातही आंतरराष्ट्रीय महिला दिन आगळ्या पद्धतीने साजरा होणार आहे. दिल्ली केंद्रावरून आज दिवसभरातल्या सर्व इंग्रजी आणि हिंदी भाषेतल्या बातम्या केवळ महिला वृत्त निवेदक सादर करत आहेत. त्याव्यतिरिक्त संध्याकाळी सव्वानऊ वाजता या दिवसानिमित्त विशेष चर्चेचं प्रसारणही करण्यात येणार आहे.

**महिला पुरस्कार-अहिल्यानगर**

महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीनं दिला जाणारा ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार अहिल्यानगर इथल्या डॉक्टर प्राजक्ता कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. स्नेहांकुर दत्तक विधान केंद्राच्या त्या संचालिका असून, गेल्या 22 वर्षापासून बालकांच्या कौटुंबिक पुनर्वसनाचं कार्य करताहेत. या पुरस्कारानंतर त्यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली....

**असं म्हणतात ना की एक महिला शिकली तर तिच्याबरोबर तिचं सगळं कुटुंब शिकत जाणीव संपन्न होतं आणि समाजही जाणीव संपन्न होत राहतो समाजासाठी व्यापक काम आजवर स्नेहालय परिवाराने उभारलं आणि अनेक महिला मुलं या प्रवाहात सामील झाली, जाणती झाली. या सगळ्या कामाचा गौरव म्हणून सावित्रीबाई फुले पुरस्कार मला जाहीर झाला आहे त्याबद्दल मी सगळ्या बृहत स्नेहालय परिवाराचे आभार मानते आणि स्नेहालयाचे सगळे पाठीराखे हितचिंतक यांच्यातर्फे मी हा पुरस्कार स्वीकारते.**

**वेव्हज परिषद**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन यासाठी आयोजित होत असलेल्या वेव्ज् शिखर परिषदेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी काल मुंबईत बैठक घेतली. 2024 पर्यंत जागतिक माध्यम आणि मनोरंजन उद्योग तीन ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज असल्याचं जाजू यावेळी म्हणाले. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय, महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने 1 ते 4 मे या कालावधीत वेव्जचे आयोजन करण्यात आलं आहे.

या संदर्भात बोलताना भारताच्या आध्यात्मिक वारशाला चालना देणे, देशाला जागतिक सामग्री केंद्र आणि निर्यातदार म्हणून स्थान देणे, बौद्धिक संपदा परिसंस्थेला चालना देणे, भारताची सांस्कृतिक आणि भाषिक विविधता जपणे, भारतीय माध्यमांची जागतिक उपस्थिती वाढवणे आणि मोठ्या आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करणे आहे ही या परिषदेची उद्दीष्ट असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

**भारत-रशिया**

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि रशियाचे उप परराष्ट्र मंत्री आंद्रे रुडेन्को यांच्यात काल रशियाच्या परराष्ट्र कार्यालयात चर्चा झाली. यावेळी द्वीपक्षीय संबंधांच्या दृष्टीने संपूर्ण क्षेत्राचा आढावा घेतला तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर दृष्टीकोन सामायिक केले. उभय देशांनी, गेल्या वर्षी जुलैमध्ये मॉस्को इथं झालेल्या 22 व्या वार्षिक शिखर

परिषदेत घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीवरील प्रगतीचा आढावा घेतला. या भेटीदरम्यान, परराष्ट्र सचिवांनी रशियाच्या विविध उच्चपदस्थ अधिकारी आणि मंत्र्यांची भेट घेतली.

**<u>भारत सिंगापूर</u>**

भारत आणि सिंगापूर यांच्या दरम्यान परराष्ट्र स्तरावरील चर्चेचा 18 वा टप्पा काल सिंगापूर इथं पार पडला. भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयातले सचिव जयदीप मुझुमदार यांनी केलं तर सिंगापूरचे नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयाचे स्थायी सचिव ल्यूक गोह यांनी केलं. भारत सिंगापूर दरम्यान द्वीपक्षीय आणि बहुपक्षीय सहकार्याचा आढावा तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक बाबींवर विचारांची देवाणघेवाण झाली.

**<u>रेल्वे लोको पायलट</u>**

रेल्वेमध्ये महिला लोको-पायलट च्या संख्येत पाच पटीने वाढ झाली असल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली. कार्यप्रणालीतल्या आव्हानांमुळे रेल्वे हे पूर्वी पुरुषांचं वर्चस्व असलेलं क्षेत्र होते. मात्र आता ही आव्हानं स्विकारत महिलांनी लोको पायलट, स्टेशन मास्टर, ट्रॅकमन, सिग्नल देखभाल, गार्ड आणि गँगमन यासारख्या क्षेत्रातही प्रवेश केला आहे. रेल्वेमध्ये महिला कर्मचाऱ्यांची सध्याची संख्या एक लाखांहून अधिक आहे, जी रेल्वेच्या एकूण संख्येच्या सुमारे 8 पूर्णांक 2 टक्के आहे. महिला लोको पायलटची सर्वाधिक संख्या उत्तर प्रदेशात असून त्यानंतर तेलंगण आणि तामिळनाडूचा क्रमांक लागतो. सुरेखा यादव या आशियातील पहिल्या महिला लोको पायलट आहेत. दरम्यान, भारतीय रेल्वेनं रेल्वे संरक्षण दलातल्या महिला कर्मचाऱ्यांना मिरची स्प्रे कॅन च्या माध्यमातून सुरक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**<u>वादळ</u>**

ऑस्ट्रेलियामध्ये ब्रिस्बेन शहराला आज अल्फ्रेड चक्रीवादळ धडकण्याची शक्यता लक्षात घेता, स्थानिक अधिकाऱ्यांनी हजारो लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे आदेश दिले आहे. वादळामुळे मुसळधार पाऊस, प्रचंड लाटा आणि जोरदार वारे वाहात आहेत. त्यामुळे वीजपुरवठा खंडीत झाला आहे. क्वीन्सलँड आणि न्यू साउथ वेल्समधील 80,000 हून अधिक घरांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. ब्रिस्बेन विमानतळ तर 1000 हून अधिक शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या.

**<u>बुद्धिबळ</u>**

फिडे जागतिक कनिष्ठ बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या अठरा वर्षीय प्रणव वेंकटेशननं विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. हा किताब पटकावणारा प्रणव चौथा भारतीय ठरला आहे. दरम्यान, ग्रँडमास्टर अरविंद चिदंबरमने काल रात्री चेक प्रजासत्ताकमध्ये प्रतिष्ठित प्राग मास्टर्स स्पर्धेमध्ये झेंडा रोवला. अंतिम फेरीत, अरविंदने तुर्कीच्या एडिझ गुरेलविरुद्ध जोरदार बरोबरी साधत एकमेव पहिले स्थान पटकावले.

**<u>महिला कब्बडी</u>**

तेहरान इथं सुरू असलेल्या सहाव्या आशियाई महिला कंबड्डी अजिंक्यपद स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य फेरीत भारतानं नेपाळचा 56-18 असा पराभव करत अंतिम फेरी गाठली आहे. तर इराणनं दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात बांग्लादेशचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. अंतिम फेरीचा सामना आज दुपारी भारत-इराण यांच्यादरम्यान होईल.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.